


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २६०, बुधवार ३ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## नगर-मनमाड रस्त्यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक

**■ खा. नीलेश लंके यांनी घेतली नितीन गडकरी यांची भेट ■ खा. लंके अमित शहा, राहूल गांधी यांच्याही भेटीला ■ खा. लंके लागले कामाला**



■ खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व राज्यमार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन नगर-मनमाड रस्त्याच्या दुरावस्थेविषयी चर्चा केली. ■ खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची सदिच्छा भेट घेतली. ■ खा. नीलेश लंके यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेऊन चर्चा केली.

नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी

**बहुचर्चीत नगर-मनमाड रस्त्याच्या रखडलेल्या दुरूस्तीसंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची मंगळवारी नवी दिल्ली येथे भेट घेतली. या रस्त्याच्या रखडलेल्या कामासंदर्भात गडकरी यांनी पुढील आठवडयात रस्ते वाहतूक मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक बोलविण्यात आल्याचे खा. लंके यांनी सांगितले. दरम्यान, मंगळवारी खा. लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचीही भेट घेऊन चर्चा केली.**

नगर-मनमाड तसेच नगर-पाथर्डी या दोन्ही रस्त्यांची दुरावस्था झाल्याने त्यांची दुरूस्ती करण्याच्या मागणीसाठी खा. लंके यांनी मागील वर्षी उपोषण केले होते. त्यावेळी महाविकास आघाडीचे तत्कालीन नेते अजितदादा पवार यांनी उपोषणाच्या चौथ्या दिवशी नगर येथे येत शिष्टाई करीत हे आंदोलन मागे घेण्यास भाग पाडले होते. त्यावेळी पवार यांनी थेट नितीन गडकरी यांच्याशी संपर्क करून लंके यांच्या या आंदोलनात तोडगा काढला होता. गडकरी यांनी पवार यांच्यासह लंके यांच्याशीही चर्चा करून विशेषतः नगर-पाथर्डी रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याची ग्वाही दिली होती. व हे लगेच सुरू होऊन पुर्णही झाले होते. नगर-मनमाड रस्त्याचेही काम सुरू झाले मात्र ते पुन्हा थंडावल्याने नागरीकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येत होती.

लोकसभा निवडणूकीदरम्यान राहुरी मतदारसंघात नगर-मनमाड रस्त्याच्या दुरावस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. खा. लंके यांच्याकडूनही या रस्त्याच्या दुरावस्थेस तत्कालीन खासदार डॉ. सुजय विखे हेच जबाबदार असून त्यांच्या घराकडे जाणारा रस्त्याही त्यांना करता आला नसल्याची टीका त्यांनी त्यावेळी वारंवार केली होती.

दरम्यान, खा. नीलेश लंके हे संसदेमध्ये शपथ घेण्यासाठी गेले होते त्यावेळीही नितीन गडकरी यांची संसदेच्या आवारात त्यांची भेट झाली होती. त्याच वेळी लंके यांनी नगर-मनमाड रस्त्याच्या कामाविषयी गडकरी यांच्याकडे तक्रार केली होती. त्यावेळी गडकरी यांनी कार्यालयात येऊन त्यासंदर्भात निवेदन देण्याबाबत सुचित केले होते.
गडकरी यांच्या सुचनेप्रमाणे खा. लंके यांनी नगर-मनमाड रस्त्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले. या रस्त्यावर शेकडो प्रवाशांचे बळी गेले असल्याचे लंके यांनी मंत्री गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. याच मार्गाने शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातील भाविक जात असतात. या भाविकांनाही खराब रस्त्यामुळे मन:स्ताप सहन करावा लागत असल्याचेही लंके यांनी गडकरी यांना सांगितले. त्यावर गडकरी यांनी पुढील आठवडयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्याच्या सुचना संबंधितांना दिल्या. या बैठकीस खा. लंके हे देखील उपस्थित राहणार आहेत.

### माझी मदत असेल

एका सामान्य कुटूंबातून संसदेत आलेल्या खा. नीलेश लंके यांना त्यांच्या मतदारसंघातील कामांसाठी माझी नेहमी मदत राहील अशी ग्वाही मंत्री गडकरी यांनी यावेळी बोलताना दिली. माझ्या खात्याअंतर्गत येणाऱ्या कामाचे प्रस्ताव सादर करा, त्यास प्राधान्याने मंजुरी देण्याची ग्वाही गडकरी यांनी यावेळी दिली.

### विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांची भेट

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचीही खा. लंके यांनी यावेळी भेट घेतली. कोरोना संकटात तुम्ही अतिशय चांगले काम केल्याचे नेहमी ऐकत होते. आज प्रत्यक्षात भेटण्याचा योग आल्याचे राहुल गांधी खा.नीलेश लंके यांच्या भेटीनंतर म्हणाले. एका बलाढय शक्तीविरोधात तुम्ही संपादन केलेला विजय निश्चित कौतुकास्पद असल्याचे नमुद करून सर्वसामान्य घरातील व्यक्तीच्या पाठीशी लोकमत असेल तर ती कोणतीही निवडणूक जिंकू शकते हीच भारतीय संविधानाची, लोकशाहीची ताकद असल्याचे गांधी यावेळी म्हणाले.

### गृहमंत्री अमित शहा यांची भेट

संसदेत खा. नीलेश लंके यांनी गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन चर्चा केली. शहा यांनी निवडणूकीत मिळविलेल्या यशाबद्दल खा. लंके यांचे अभिनंदन करून त्यांनी कोरोना महामारीच्या काळामध्ये केलेल्या अद्वितीय कामाबद्दल कौतुकही केले.

### गांधी कुटूंबातील सदस्याची प्रथमच भेट

राहुल गांधी यांच्या रूपाने देशासाठी बहुमुल्य योगदान देणाऱ्या गांधी परिवारातील सदस्याची आज प्रथमच भेट झाली. त्यांच्या भेटीमुळे मी भारावून गेलो. स्व. इंदिरा गांधी, स्व. राजीव गांधी यांनी देशासाठी आपले बलिदान दिले. याच परिवाराच्या नेतृतवाखाली देशाने प्रगतीपथावर घोडीदौड सुरू केली. त्याचा संपूर्ण देशाला अभिमान आहे. त्यामुळेच गांधी परिवार देशातील प्रत्येक नागरीकासाठी आदरस्थानी आहे.

खा. नीलेश लंके

## झावरे, चौधरी, लंके यांचे अटकपूर्व जामीन फेटाळले

**■ नगर सत्र न्यायालयाचा निर्णय ■ उर्वरीत २१ आरोपींचे जामीन कायम**

नगर : प्रतिनिधी



**अॅट्रसिटीसह विनयभंगाच्या गुन्हयाप्रकरणी लंके समर्थक अॅड. राहुल झावरे, संदीप चौधरी, दीपक लंके यांचे अटकपूर्व जामीन नगरच्या सत्र न्यायालयाने सोमवारी फेटाळले. दरम्यान एकूण २४ आरोपींपैकी २१ आरोपींचे जामीन सत्र न्यायालयाने कायम केले.**

नगरच्या तोफखाना पोलीस ठाण्यात दि.६ जुन रोजी गोरेगांव ता. पारनेर येथे घडलेल्या घटनेप्रकरणी ७ जुलै रोजी महिलेने २४ आरोपींविरोधात अॅट्रसिटी व विनयभंगाचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींनी नगरच्या सत्र न्यायालयापुढे अटकपुर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. दि. १४ जुन रोजी न्यायालयाने सर्व आरोपींना अंतरिम जामीन मंजुर करून दि. १ जुलै रोजी पुढील सुनावणी ठेवली होती.

या सुनावणीवेळी न्यायालयाने अॅड. राहुल झावरे, संदीप चौधरी व खा. नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांचे अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द ठरवून त्यांचे जामीन अर्ज फेटाळून लावले तर उर्वरीत प्रसाद नवले, अनिल गंधाक्ते, संदीप ठाणगे, राजू तराळ, महेंद्र गायकवाड, नंदू दळवी, किरण ठुबे, रामा तराळ, जितेश सरडे, कारभारी पोटघन, दादा शिंदे, बापू शिर्के, बाजीराव कारखिले, किशोर ठुबे, दत्ता ठाणगे, लखन ठाणगे, अक्षय चेडे, बंटी दाते, संदेश झावरे यांचे अंतरिम जामीन कायम करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

आरोपींच्या वतीने अॅड. सतीश गुगळे, अॅड.अभिषेक भगत, अॅड. अरूण बनकर, अॅड गणेश कावरे, अॅड. स्नेहा झावरे यांनी काम पाहिले.

## १ जुलै पासून दूधाला ३० रुपयाचा भाव आणि ५ रुपये अनुदान

**■ मंत्री विखे पाटील यांचे सभागृहात निवेदन ■ शेतकऱ्यांना दिलासा**

मुंबई : प्रतिनिधी



**राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून राज्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सभागृहात दूध उत्पादन शेतकऱ्यांना प्रतिलिटर ३० रुपये तर शासनाकडून ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले. सदरचे दर हे १ जुलै पासून राज्यभर लागू केले जातील असे स्पष्ट करतानाच दुध भुकटी करीता प्रति किलो ३० रूपये अनुदान देण्यात असल्याचे त्यांनी सांगितले.**

राज्यभर दुधाच्या दरावरून दूध उत्पादक शेतकरी चिंतेत असताना राज्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि दुधाचे दर निश्चित करण्यासाठी सोमवारी मंत्रालय येथील परिषद सभागृहात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला राज्यभरातील सहकारी तथा खासगी दूध उत्पादक संघाचे प्रतिनिधी, दूध उत्पादन शेतकऱ्यांचे प्रतिनिधी त्याच बरोबर पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे प्रमुख अधिकारी यांच्यासह माजी आ.शिवाजीराव कर्डिले, माजी आ.सदाभाऊ खोत,आमदार विनायक कोरे, आमदार मंगेश चव्हाण तसेच एनडीडीबीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर आदी मान्यवर उपस्थित उर्वरीत पान ३ वर

## अंबादास दानवे विधानपरिषदेतून निलंबित

**शिवीगाळ प्रकरणी विरोधी पक्षनेत्यांवर कारवाई**

मुंबई : प्रतिनिधी



**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लोकसभेत बोलताना हिंदुत्वाविषयी केलेल्या वक्तव्यानंतर एकच गदारोळ झाला होता. त्यानंतर पावसाळी अधिवेशनात याचे पडसाद पाहायला मिळाले. राहुल गांधींच्या वक्तव्यानंतर अंबादास दानवे यांनी आपल्याला शिवीगाळ केल्याचा आरोप भाजप आमदार प्रसाद लाड यांनी केला होता. आता शिवीगाळ प्रकरणानंतर अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी निलंबन करण्यात आलं आहे. विरोध पक्षनेत्यांचे पाच दिवसांसाठी सभागृहातून निलंबन करण्यात आले आहे.**

दरम्यान, राहुल गांधी यांच्या हिंदुत्वाच्या वक्तव्यावरुन भाजप आमदार प्रसाद लाड यांनी राहुल गांधींच्या वक्तव्याचा निषेध करत ठराव मांडला आणि तो लोकसभेत पाठवण्याची मागणीही केली. तसेच विरोधी पक्षनेत्यांनी यावर उत्तर द्यावे असेही ते म्हणाले होते. त्यानंतर प्रसाद लाड यांनी अंबादास दानवेंवर त्यांनी शिवीगाळ केल्याचा आरोप केला. तसेच दानवेंनी हिंदूंचा अवमान केल्याचे म्हणत त्यांनी सभागृहाची माफी मागावी असेही प्रसाद लाड म्हणाले होते.

राहुल गांधी यांच्या वक्तव्यावरुन भाजप आमदार प्रसाद लाड आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उर्वरीत पान ३ वर

## सचिन कोतकरसह सहा जणांविरोधात गुन्हा

**हॉटेल व्यवस्थापकास शिवीगाळ, दमदाटी व जीवे मारण्याची धमकी**

नगर : प्रतिनिधी




**सक्कर चौकातील हॉटेल यश पॅलेसचे व्यवस्थापक राकेशकुमार रामनारायण सिंग यांना शिवीगाळ, दमदाटी व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सचिन कोतकरसह इतर सहा जणांविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात राकेशकुमार सिंग यांनी दिलेल्या फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे की, सन २०२० पर्यंत सिंग हे कोतकर यांच्या सक्कर चौकातील उदयनराजे पॅलेस येथे मॅनेजर म्हणून नोकरी करत होते. सन २०२१ मध्ये सिंग हे समोरच्या यश पॅलेसमध्ये नोकरीसाठी गेल्यानंतर हॉटेलचे मालक सचिन कोतकर हे आमच्या हॉटेलसमोरील हॉटेलमध्ये नोकरी करू नकोस, इतर कोठेही काम कर अशी दमदाटी करीत. त्यासंदर्भात सिंग यांनी पोलीस अधीक्षकांकडे त्यावेळी तक्रारही दिली होती.

सिंग यांनी सचिन कोतकर यांच्याविरोधात तक्रार केल्यानंतर हॉटेल उदयनराजे पॅलेस येथील रोशनकुमार मिश्रा व त्याच्या साथीदारांनी यश पॅलेसचे कर्मचारी पिंटू विनोद सिंग यास मारहाण केली. त्यानंतर पिंटू सिंग यानेही पोलीसात तक्रार दिली होती. त्यानंतर वेळोवेळी उदयनराजे पॅलेस येथील सुरज अप्पासाहेब शेळके, गणेश पांडूरंग सातपुते, सचिन पांडूरंग सातपुते यांना सचिन कोतकर हे राकेशकुमार सिंग यांच्याकडे पाठवून यश पॅलेसमध्ये काम उर्वरीत पान ३ वर

## राज्यात जुलैमध्ये जास्त पावसाच्या सरी

**हवामान विभागाचा अंदाज**



नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**सध्या सगळीकडे पाऊस बरसत आहे. त्यातच पुढील तीन दिवसांत देशाच्या उर्वरित भागात मोसमी पाऊस दाखल होईल. जुलै महिन्यात राज्यासह देशभरात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.**

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरातील एल-निनो तटस्थ अवस्थेत गेलाय. तर ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यांत ला निना स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे. तर हिंदी महासागरातील द्वि ध्रुविता सध्या तटस्थ आहे. मोसमी पावसासाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे जुलै महिन्यात देशभरात सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. जुलै महिन्यात देशात सरासरी उर्वरीत पान ३ वर









# युवा

# लग्न करण्याआधी कोणत्या टेस्ट कराव्यात ?



ज्यावेळी आईचा रक्तगट RH निगेटिव्ह असतो त्यावेळी तिला RH पॉझिटिव्ह बाळ होते. अशा परिस्थितीत बाळाच्या आणि तिच्या आरोग्याला धोका असतो. त्यामुळे थोडी काळजी घ्यावी लागते. अशा परिस्थितीत आई RH निगेटिव्ह आहे हे जर आधीच समजले, तर त्याबाबत योग्य ती काळजी घेता येते. आई आरएच निगेटिव्ह आणि वडील RH पॉझिटिव्ह असतात तेव्हा त्यांच्या जन्माला येणारे बाळ आरएच positive असेल तर बाळाला त्रास होऊ शकतो. पण, त्यामुळे लग्न टाळण्याची काही गरज नाही. कारण यावर वैद्यकीय सल्ल्याने आवश्यकती काळजी घेता येते. आईचा रक्तगट निगेटिव्ह आणि वडिलांचा पॉझिटिव्ह आहे हे जर आधीच समजले, तर त्यानुसार बाळाची काळजीही घेता येते. एवढ्याशा कारणावरून लग्न न करण्याचा निर्णय घेणे अयोग्य आहे. त्यामुळे तसेच समान रक्तगटाचे लोक लग्न करू शकतात. या बद्दल उगीच गैरसमज आहेत. लग्न करणाऱ्या जोडप्याचा चा रक्तगट सारखा नसावा हे सांगण्याला काही शास्त्रीय आधार नाही त्यामुळे रक्तगट कोणताही असो; पण तो जोडप्याला लग्न करण्यापूर्वी माहीत असणे आवश्यक आहे.

## रक्तगट सारखा असावा की नसावा ?

**लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा अन् तितकाच महत्त्वाचा क्षण असतो. त्यामुळे लग्नासाठी वधू-वर आणि त्यांचे कुटुंबीय फार उत्साही असतात. पण लग्न जमवताना सर्वांत आधी दोघांची कौटुंबिक स्थिती, उत्पन्न व सौंदर्य अशा गोष्टी विचारात घेतल्या जातात. त्यानंतर वधू-वरांच्या कुंडल्या एकमेकांशी जुळतात का हे पाहिले जाते. त्यात हल्ली कुंडलीबरोबरच रक्तगटाबाबतही चौकशी केली जाते. लग्न करणाऱ्या वधू-वराचा रक्तगट सारखा असेल, तर अडचणी येतात, असे अनेकदा म्हटले जाते. पण, हा नेमका समज आहे की गैरसमज हेच अनेकांना समजत नाही. त्यात हल्ली अनेक जोडपी लग्न करण्यापूर्वी विविध आरोग्य चाचण्या करण्यावर भर देत असल्याचे दिसते. त्यासाठी मेडिकल लॅब वेगवेगळ्या प्रकारच्या ऑफर्सही देतात. आतापर्यंत लग्न करण्यापूर्वी जोडप्याने एचआयव्ही एड्सची चाचणी करावी, असा सल्ला आरोग्य तज्ञांकडून दिला जात असल्याचे ऐकले किंवा अनेक जोडपी तशी चाचणी करतातही. पण, त्यासह अशा काही आरोग्य चाचण्या आहेत की, ज्या तुमच्या वैवाहिक आयुष्यासाठी महत्त्वाच्या असतात. त्यामुळे लग्न करण्यापूर्वी जोडप्याने कोणत्या आरोग्य चाचण्या कराव्यात आणि त्याची गरज का आहे ? याविषयी महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवेचे वरिष्ठ आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप आवटे यांनी दिलेली माहिती जाणून घेऊ...**

- रक्तगट : लग्न करण्यापूर्वी दोघांना एकमेकांचा रक्तगट माहीत असणे गरजेचे आहे. जे आजार स्त्री-पुरुष संबंधांतून पसरतात, जसे की एचआयव्ही एड्स, हेपॅटायटिस बी, ई, सी, इतर गुप्तरोग जसे सिफिलिस या आजारांची तपासणी करणे सहज शक्य आहे. अनेकदा काही आनुवंशिक आजारांचाही यात समावेश असतो.
- सिकल सेल : महाराष्ट्रात अनेक आदिवासी भागांत सिकल सेल ॲनिमियाचे प्रमाण अधिक आहे. पत्नी आणि पतीला सिकल सेल ॲनिमियाची लागण झाली असेल, किंवा जर ते या आजाराचे वाहक असतील तर त्यांच्या होणाऱ्या बाळालाही तो होण्याची शक्यता अधिक वाढते. सिकल सेल प्रभावित क्षेत्रातील लग्न करणाऱ्या जोडप्यांनीही सिकल सेल ॲनिमियाची चाचणी करून घेणे आवश्यक आह
- डाऊन सिंड्रोम : आजकाल लग्नाचे वय वाढत आहे. त्यामुळे बाळ होतानाचे आईचे आणि वडिलांचे वय ३५ च्या पुढे गेले, तर विविध आजारांचा धोका वाढतो. निसर्गाने निरोगी अपत्य जन्माला येण्याचे एक वय निश्चित केले आहे. त्यामुळे लग्न खूप उशिरा झाले, तर अनेकदा बाळाला आनुवंशिक आजार होण्याचा धोका असतो किंवा स्मरणशक्ती आणि बुद्धीमत्तेने कमजोर असलेले बाळ जन्माला येणाचा धोका वाढतो. त्यामुळे दोघांमध्ये एक जरी जनुकीय दोष असेल, तर दिव्यांग मूल जन्माला येण्याची शक्यता असते.
- युरिन टेस्ट : युरिन टेस्टच्या माध्यमातून दोघांना काही मूत्रमार्गाचा संसर्ग आहे का ते समजते. स्त्री-पुरुष संबंधांच्या अनुषंगाने हा महत्त्वाचा मुद्दा आहे; पण युरिनसंबंधित काही आजार असेल तरी तो आठवडाभराच्या औषधोपचाराने बरा होऊ शकतो.
- जेनेटिक डिजीज टेस्ट : लग्न करण्यापूर्वी वधू-वराने जेनेटिक डिजीज टेस्ट करून घेतली पाहिजे. कारण- दोघांपैकी एकाला कोणताही आनुवंशिक आजार असल्यास तो एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होऊ शकतो. आनुवंशिक आजारांमध्ये मधुमेह, किडनीचे आजार, कर्करोग यांसारख्या आजारांचा समावेश आहे. त्यामुळे जेनेटिक डिजीज टेस्टमुळे पती-पत्नी यापैकी कोणाला एखादा आजार असेल, तर मूल जन्माला घालण्याचा विचार करताना आवश्यक ती काळजी घेता येते.
- इन्फर्टिलिटी टेस्ट : मूल जन्माला घालण्यात व्यक्ती किती सक्षम आहे हे इन्फर्टिलिटी टेस्टद्वारेच कळू शकते. कारण या आजारासंबंधीची लक्षणे डोळ्यांनी दिसत नाहीत. या चाचणीद्वारे पुरुषांच्या शुक्राणूंची संख्या आणि महिलांच्या अंडाशयाचे आरोग्य तपासले जाऊ शकते. त्यामुळे बाळाचे नियोजन आणि चांगले शारीरिक संबंध राखण्यास मदत होते.
- सेक्शुअली ट्रान्स्मिटेड डिजीज टेस्ट : उशिरा लग्न करण्याच्या वाढत्या ट्रेंडमुळे लग्नापूर्वी शारीरिक संबंध ठेवण्याचे प्रमाण वाढताना दिसतेय. हल्ली ही एक सामान्य गोष्ट झाली आहे; परंतु त्यासोबतच लैंगिक आजारांचा धोकाही खूप वाढला आहे. अशा रोगांमध्ये एचआयव्ही एड्स, गोनोरिया, नागीण, सिफिलीस व हेपॅटायटिस सी यांचा समावेश आहे. त्यापैकी बरेच रोग घातकदेखील आहेत. ते लक्षात घेता, लग्न करण्यापूर्वी सेक्शुअली ट्रान्समिटेड डिजीज टेस्ट (STDs चाचणी) करणे महत्त्वाचे आहे. कारण- लग्नानंतर हे आजार तुमच्या जीवनसाथीद्वारे तुमच्यापर्यंत पसरू शकतात.
- मानसिक आरोग्य : लग्नापूर्वी मानसिक आरोग्याशी संबंधित करण्यायोग्य कोणत्याही विशिष्ट चाचण्या नाहीत. पण, ते तपासले जाणे ही गरजेची गोष्ट आहे. अनेकदा मानसिक आरोग्य तपासणीतून तुम्हाला तुमच्या जोडीदाराचे मानसिक आणि भावनिक आरोग्य कशा पद्धतीचे आहे ते समजते.

## विवाहपूर्व समुपदेशन का गरजेचे आहे ?

लग्न ही प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट असते. त्यात दोन वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती एकत्र येतात, एकत्र संसार करतात. त्यांनी कशा पद्धतीने राहावे, त्यांच्यातील ताणतणाव कसा कमीत कमी राहील आणि दोघांनी एकमेकांना स्पेस कशा पद्धतीने द्यावी हे समजून घेण्यासाठी समुपदेशन गरजेचे असते. या गोष्टी आपोआप कोणाला जन्मजात कळत नाहीत. त्यात दिवसेंदिवस घरे छोटी होत आहेत. त्यामुळे मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी मोठी माणसे नाहीत. पूर्वी आजी, आजोबा किंवा जाणती अशी माणसे काही झाले, तर समजून सांगायची; पण विभक्त कुटुंबात नवविवाहित जोडप्यांना मार्गदर्शन करणारी पूर्वीसारखी जाणती माणसे नाहीत. त्यामुळे विवाहपूर्व समुपदेशनात तुमचे नात काय आहे, तुमच्या जबाबदाऱ्या काय आहेत आणि त्या कशा पद्धतीने निभावल्या पाहिजेत, तसेच त्या निभावताना आपल्यातील नाते भावनिक आणि मानसिकदृष्ट्या अधिक भक्कम करणे गरजेचे असते. तसेच आपली कर्तव्ये काय आहेत, कसे वागले पाहिजे, काय टाळले पाहिजे हे सर्व कळणे आवश्यक आहे.



## तुमचे लग्नाचे वय का महत्त्वाचे असते ?

तुम्ही अनेकदा पाहता की, थोरल्या मुलापेक्षा दुसऱ्या किंवा तिसऱ्या नंबरचे मूल हे हुशार असते. म्हणजे आई-वडील जेवढे परिपक्व असतील तेवढे होणारे मूल हे बुद्धिमान असते, असे म्हटले जाते; परंतु त्यालाही वयाच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे असे नाही की, ५० व्या वर्षी अपत्यप्राप्ती निर्णय द्यावा. तसेच वयाच्या पस्तिशीनंतर बाळाला जन्म दिल्याने डाउन सिंड्रोमचा धोका वाढतो. याचा अर्थ प्रत्येक बाळाला असे होईल असे नाही पण प्रमाण वाढते त्यात हल्ली लग्न उशिरा करण्याचे प्रमाण वाढतेय. त्यामुळे पस्तिशीआधी अपत्यप्राप्ती होणे योग्य ठरू शकते. त्यासाठी काही विशिष्ट नियम किंवा सक्ती नाही; पण वाढत्या वयाबरोबर वाढत्या आरोग्य समस्या लक्षात घेता, योग्य वयात अपत्य होणे गरजेचे आहे.

# हॅपी वाइफ, हॅपी लाइफ...

## अशा पुरुषांची बायको कायम खुश

लग्न हे दोन व्यक्तींना एकत्र बांधणारे पवित्र बंधन आहे हे तर तुम्हीदेखील मान्य कराल! प्रेम आणि भांडणापासून सुरू झालेले कोणतेही नाते आयुष्यभर असेच चालू राहते. प्रत्येक नात्याप्रमाणे पती - पत्नीच्या नात्यातही अडचणी येतात, पण जे कपल्स आपले नाते हुशारीने टिकवून ठेवतात. त्यांच्यात नाराजी फार काळ टिकत नाही. हेदेखील खरे आहे की जर ही गोष्ट जमली नाही तर सुखी वैवाहिक जीवन हे दुःखी वैवाहिक जीवनात बदलायला वेळ लागत नाही. नात्यात प्रेम आणि विश्वासासोबतच समजूतदारपणाचा अभाव असतो तेव्हा हे जास्त घडते. अशावेळी मनात नसतानाही प्रेमळ नात्याचा शेवट करावा लागतो. तुमचे लव्ह मॅरेज होत असो वा ते अरेंज्ड असो, त्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करावे लागतात. अनेक छोट्या भांडणांकडे दुर्लक्ष करावे लागते. तरच तुमचे वैवाहिक जीवन सुखी होईल. आज आम्ही या लेखात वैवाहिक जीवन आनंदी करण्यासाठी येथे काही टिप्स देत आहोत, ज्या तुम्हाला खूप मदत करू शकतात...



### एकमेकांचे दुःख समजून घ्या

जिथे सुखी वैवाहिक नाते असे असते तिथे पती-पत्नीला त्यांच्या आनंदासोबत एकमेकांचे दुःख कसे वाटून घ्यावे हे माहित असते. तुमचा जोडीदार कोणत्या परिस्थितीतून जात आहे हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. जरी तुम्ही त्यांच्या समस्या सोडवू शकत नसाल. पण तुमचा नैतिक पाठिंबा त्यांना त्यांच्या समस्यांमध्ये खूप धैर्य देऊ शकतो. त्याच वेळी, जर तुम्ही एकमेकांच्या कृती आणि वागणूक चांगल्या प्रकारे समजून घेत असाल, तर यामुळे प्रत्येक परिस्थितीत तुमच्यातील परस्पर समंजसपणा वाढेलच पण तुमचे नातेही मजबूत होईल.

### नात्यात असावी पर्सनल स्पेस

तुमच्या वैवाहिक जीवनात आनंद कधीच हरवू नये असे तुम्हाला वाटत असेल तर एकमेकांच्या पर्सनल स्पेसची काळजी घ्या. प्रेम असो किंवा अरेंज्ड मॅरेज, जेव्हा दोन व्यक्ती या नात्यात येतात तेव्हा त्यांना एकमेकांशी खूप तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत जर तुम्ही तुमच्या जोडीदारावर नियंत्रण ठेवत असाल तर तो तुमच्यापासून अंतर राखण्यास सुरुवात करेल. खरं तर, तुम्हाला तुमच्या आयुष्याच्या जोडीदाराशी सतत चिकटून राहण्याची गरज नाही. असे केल्याने तुमचा पार्टनर तुमच्यावर रागावू शकतो, ज्यामुळे तुमचे नाते कमकुवत होऊ शकते.

### एकमेकांवर असावा विश्वास

विश्वासाशिवाय लग्न होऊ शकत नाही असे कोणीतरी योग्यच म्हटले आहे. कोणत्याही सुखी वैवाहिक जीवनासाठी कपल्स ,मधील विश्वास हा सर्वात महत्त्वाचा घटक असतो. खरे तर प्रत्येक नात्याचे प्रश्न वेगळे असतात. कपल्समध्ये चढ-उतार असतात, परंतु तरीही त्यांनी एकमेकांवरील विश्वास गमावू नये. अशा परिस्थितीत, जर तुमचा तुमच्या नात्यातील विश्वास कमी झाला तर तुम्हाला तुमच्या जोडीदारात फक्त दोष दिसतील, परिणामी तुमचे नाते जास्त काळ टिकणार नाही.



### आवडी निवडीची काळजी घ्या

पती-पत्नीने एकमेकांच्या आवडीनिवडी जाणून घेतल्या पाहिजेत. यामध्ये जोडीदाराच्या खाण्यापिण्यापासून ते त्यांच्या कपड्यांपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश असावा. असे केल्याने तुम्ही एकमेकांना अधिक जाणून घ्यालच पण त्याचा परिणाम तुमच्या वैवाहिक जीवनातही नक्कीच दिसून येईल. खरं तर प्रत्येकाची विचारसरणी आणि जीवनशैली खूप वेगळी असते. अशा वेळी तुमच्या नात्याची इतरांशी तुलना करण्याऐवजी ते सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. जर तुम्ही तुमच्या जोडीदाराकडे पूर्णपणे लक्ष दिले तर तुमच्या नात्यात कधीही अडचण येणार नाही.

### प्रसंगात साथ देण्याची तयारी ठेवा

लग्नाआधी जी परिस्थितीत आहे तिच लग्नानंतरही तशीच राहिल याची काहीच शाश्वती नसते त्यामुळे आहे त्या परिस्थितीत आणि प्रसंगात एकमेकांसोबत उभं राहण्याची तयारी नवरा-बायकोने ठेवली पाहिजे. मग ते रंग, रूप, पैसा, सुख, करिअर कोणत्याही बाबतीत असू शकतं. बहुतांश वेळा प्रेग्नेंसीनंतर महिलांचे वजन खूप वाढते आणि आधीच सौंदर्य कमी होते अशावेळी नव-याने ती आधीसारखी सुंदर दिसत नाही म्हणून तिच्यावरचं प्रेम कमी करण्यापेक्षा तिची साथ देत तिचा आत्मविश्वास वाढवला पाहिजे तरंच प्रेम टिकू शकतं. कधी कधी सासरची मंडळी तिला समजून घेत नाहीत अशावेळी तुम्ही तिच्या बाजूने उभं राहून तुमच्या घरातील व्यक्तींना तिची बाजू सांगा. कारण ज्या घरातील स्त्री खुश असते तिथली लक्ष्मीही सदैव आनंदी राहते. म्हणूनच बायकोला कोणत्याही वाईट, चांगल्या प्रसंगात साथ द्या.

# मुलीने फसवल्यावर उरतात हे दोन मार्ग

**नातं तुटल्यावरची वेदना अशी असते की ती संपूर्ण आयुष्यावर इतकी परिणाम करते की ती व्यक्ती आता पूर्वीसारखी राहतच नाही. जर आपण मुलांबद्दल बोललो तर ब्रेकअप झाल्यानंतर त्यांच्याकडे निवडण्यासारखे दोनच मार्ग उरतात आणि त्यांच्यापैकी जो ते निवडतात तो मार्गच ठरवतो की त्यांचे भावी जीवन स्वर्ग असेल की नरक ?**

ब्रेकअप झाले की प्रेमात पडलेली व्यक्ती उद्ध्वस्त होते. ज्या नात्यात त्याने त्याच्या भावना, वेळ आणि आयुष्याचा प्रत्येक भाग गुंतवला होता ते नातेच उरत नाही, ना ती व्यक्ती जवळ असते. ब्रेकअपमुळे जीवनात निराशा येते. ही निराशा आणि नीरसता इतकी असते की ती तुम्हाला अधिक आत खेचते आणि मग त्यावर मात करणे मोठे कठीण बनते. हे विशेषतः मुलांसाठी कठीण होते कारण ते त्यांच्या भावना उघडपणे व्यक्त करू शकत नाहीत. उद्ध्वस्त होऊनही ते कधीच आपल्या भावना जगासमोर व्यक्त करत नाहीत आणि तशी त्यांची इच्छा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत मुलांसमोर दोनच पर्याय उरतात. यापैकी कोणता मार्ग ते निवडतात त्यावरून त्यांचे भविष्य ठरते. हे दोन मार्ग कोणते आहेत ते पाहूया...

## हे आहेत दोन रस्ते

बिटर किंवा बेटर असे हे दोन मार्ग आहेत, त्यापैकी कोणताही एक मार्ग निवडल्याने ब्रेकअपनंतर मुलाचे आयुष्य कसे असेल त्याचा अंदाज लावता येतो. यापैकी bitter या इंग्रजी शब्दाचा अर्थ bitterness असा होतो, तर better चा अर्थ उत्तम असा होतो.

- पहिला मार्ग : पहिला मार्ग ब्रेकअपमुळे निर्माण होणाऱ्या नकारात्मक भावनांचे तुमच्यावर इतके गारुड करतो की तुम्ही तुमचे अस्तित्व हरवून बसता आणि तुमच्यातील सकारात्मकता नष्ट होते. असं झालं की मनात आणि मनात द्वेष निर्माण होऊ लागतो. कटुता अगदी परमोच्च स्थानावर पोहोचते. ही गोष्ट माणसाचे आयुष्य अशा अंधारात घेऊन जाते जिथून परत यायला काही महिने, वर्षे किंवा संपूर्ण आयुष्यही लागू शकते.
- दुसरा मार्ग : दुसरा मार्ग म्हणजे बेटर अर्थात अधिक उत्तम आयुष्य बनवणे. गेलेले जाऊ द्या. याला भूतकाळाचा भाग समजा आणि त्याचा तुमच्या वर्तमान-भविष्यावर परिणाम होऊ देऊ नका. तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा आणि तुमच्या करिअरमध्ये यश मिळवत रहा. जेव्हा आपण सकारात्मक विचार करून पुढे जातो आणि भूतकाळ मागे टाकतो, तेव्हा जीवनात पुन्हा आनंदात परत येतो.

## स्वर्गातच बांधली जाते लग्नाची बेडी

अनेक अशी प्रकरणं आहेत ज्यात मुलांनी भावनेच्या भरात चुकीचा मार्ग निवडला आणि आयुष्य संपवून घेतलं किंवा पार बरबाद करून घेतलं. या सर्वात आई-वडीलांचे काय हाल होत असतील याची कल्पनाही या मुलांना नसते. प्रेम जगातील खूप गोड गोष्ट आहे पण तिला स्वतःवर हावी होऊ देऊ नका. जोड्या या स्वर्गातच बांधल्या जातात हे बोलण्यासाठी सोपं वाक्य वाटत असलं तरीही स्वीकार केलं तर अनेक समस्या चुटकीसरशी सुटतील. सोडून गेलेली व्यक्ती ही जगातील शेवटची व्यक्ती नक्कीच नसते. त्यामुळे पुन्हा एकदा नव्याने आणि गेलेल्या व्यक्तीपेक्षा दसपट चांगली व्यक्ती आयुष्यात येऊ शकते त्यामुळे संयम ठेवा.



## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपूर एमआयडीसीत उद्योग आणा

■ **श्रीरामपूर :** येथे एमआयडीसी असून या ठिकाणी रेल्वेस्थानक आहे. जवळच विमानतळ आहे. विजेचे प्रश्न मार्गी लागलेले आहेत, असे असतानाही या एमआयडीसीमध्ये मोठमोठे उद्योग येत नाहीत, शासनाने याबाबतीत प्रयत्न केल्यास विकेंद्रीत स्वरूपामध्ये विकासाला चालना मिळेल, तसेच स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल, त्यासाठी शासनाने एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग अथवा प्रोजेक्ट आणून येथील स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार लहू कानडे यांनी विधानमंडळाच्या अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना केली.

### दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी गजाआड

■ **पारनेर :** तालुक्यातील भाळवणी परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेली परजिल्ह्यातील टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केली. अमोल नवनाथ काळे (वय २३), शामुल नवनाथ काळे (वय २०, दोन्ही रा. वाकी, ता. आष्टी, जि. बीड), सतीश लायलन भोसले (वय १९) व भरत अब्दुल ४०, दोन्ही रा. कासारी, ता. आष्टी, जि. बीड) अशी टोळीतील जेरबंद आरोपींची नावे आहेत. पथकाने जेरबंद आरोपींकडून तीन लाख ३५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घ्यावा

■ **श्रीगोंदा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमध्ये श्रीगोंदा तालुक्यातील सर्व महिलांनी सहभागी होऊन या योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेत सहभागी होण्यासाठी लागणाऱ्या मदतीसाठी महिलांनी आपले कागदपत्र घेऊन श्रीगोंदा शहरातील सोनिया गांधी पॉलिटेक्निक, इंदिरा गांधी पॉलिटेक्निक या ठिकाणी यावे. येथील कर्मचाऱ्यांच्या मार्फत त्यांचे अर्ज ऑनलाईन मोफत भरले जातील, असे राजेंद्र नागवडे आणि महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष अनुराध नागवडे यांनी सांगितले. या योजनेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### साईश गोंदकर याची सातासमुद्रापार भरारी

■ **कोपरगाव :** जिद्द आणि कष्टाच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीचेही बुरुज ढासाळतात हे आपल्या अलौकिक कामगिरीतून सिद्ध करून दाखवले आहे कोपरगाव येथील शिक्षणमहर्षी लहानुभाऊ नागरे अण्णा स्थापित रेनबो इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी साईश विनोद गोंदकर याने नुकतीच साईश याची अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सस या अग्रमानांकित विद्यापीठात बारावीनंतर कॉम्प्युटर इंजीनियरिंग या अभ्यासक्रमासाठी निवड होऊन त्याला तेथील शिष्यवृत्ती मिळाली आहे.

### एसएमबीटीत आरोग्य शिबिराचे उद्घाटन

■ **संगमनेर :** एसएमबीटी रुग्णालयात रुग्णांना दर्जेदार उपचार मिळावेत या हेतूने सुरु करण्यात आलेल्या आरोग्य साधना शिबिरास सुरुवात झाली. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात बाह्यरुग्ण तपासणी, सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया, हृदय उपचार यासोबतच खुबा व गुडघा प्रत्यारोपण, सिझेरियन व नॉर्मल प्रसूती पूर्णतः मोफत करण्यात आली आहे. यासोबतच तीन दिवस औषधोपचारांसह बाह्यरुग्ण तपासणीदेखील पूर्णपणे मोफत केली जाणार आहे. एसएमबीटीचे आरोग्यसाधना शिबीरात रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर कार्यवाहीची मागणी

■ योजना यशस्वी करण्यासाठी शिवसेनेचा पुढाकार ■ प्रशासनाला सहकार्य करण्याची तयारी



**नगर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबवून महिलांना त्याचा लाभ मिळण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने कार्यवाही करण्याच्या मागणीचे निवेदन शिवसेनेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देण्यात आले.**

यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव, भिंगार शहरप्रमुख सुनील लालबेंद्रे, नगरसेवक संजय छजलानी, युवासेना शहरप्रमुख योगेश गलांडे, उपशहर प्रमुख विशाल शितोळे, नगरसेवक रवींद्र लालबोंद्रे, युवासेना उपजिल्हाप्रमुख अभिषेक भोसले, वैद्यकीय मदत कक्षाचे उपजिल्हाप्रमुख ओंकार शिंदे, अमोल हुंबे, सागर काळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. पात्र महिलांना दरमहा पंधराशे रुपये अर्थसाह्य दिला जाणार आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी १५ जुलै पर्यंत आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करून अर्ज करण्याचे शासनाने आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड इत्यादी कागदपत्रे आवश्यक असल्याने नागरिकांकडून सेतू कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. काही ठिकाणी सेतू चालकांकडून ठरलेल्या शासकीय दरापेक्षा दाखल्यासाठी अधिकचे शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ही योजना लोकाभिमुख असून, सदर योजनेबाबत सर्वसामान्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सदरील योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता शासकीय स्तरावरुन सर्व सेतू चालकांची बैठक घेऊन त्यांना योग्य सूचना देण्यात याव्या, ही योजना राबविण्याकरिता जिल्हा प्रशासनाच्या वतीने जी कार्यपद्धती अवलंबली जाणार आहे, त्याची माहिती व या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी, कर्मचारी यांची माहिती देण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सर्वसामान्य महिलांपर्यन्त घेऊन जाण्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार असून, प्रशासनाला देखील सहकार्य केले जाणार आहे. या योजनेची जनजागृती करणे, अर्ज भरण्यास मदत केंद्र, कागदपत्राची पूर्तता करण्यास येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सर्व शिवसैनिक प्रयत्नशील असून, प्रशासकीय पातळीवर संयुक्तपणे शिबिर घेण्याची मागणी देखील जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

## (पान १ वरुन) १ जुलै पासून दूधाला ३० रुपयाचा भाव आणि ५ रुपये अनुदान

होते. सदर बैठकीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूध संघाच्या अडचणी समजून घेतल्या. त्याचबरोबर दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्या ऐकून त्यावर सविस्तर चर्चा केली. या बैठकीत झालेल्या निर्णयाची माहीती मंत्री विखे पाटील यांनी सभागृहात दिली.राज्यात सध्या सहकार दूध संघ आणि खासगी दूध संघाकडून प्रतिदिन साधारण १ कोटी ६२ लाख ८० हजार दूध संकलन केले जाते. त्यातील दुधाची गरज पूर्ण झाल्यावरही अतिरिक्त दूध हे बुकटी तथा बटर बनविण्यासाठी पाठविले जाते. याबाबतही सदर बैठकीत महत्वाची चर्चा करण्यात आली. भुकटी व बटर प्रकल्पांनाही नुकसान होणार नाही यासाठी सरकार विचाराधीन असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, अनुदानाची प्रक्रिया अधिक सुलभ केली जाईल. मागील रखडलेल्या अनुदानासाठी १५ जुलै पर्यंत शासनाच्या संकेतस्थळावर माहिती अद्यावत करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली तर राज्यभर सरसकट खासगी तथा सहकारी दूध संघाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३० रुपये प्रतिलिटर दर दिला जाणार आहे. हे दर १ जुलैपासून लागू केले जातील. तसेच जे अतिरिक्त दूध भुकटीसाठी पाठविले जाते. त्यांना सुद्धा शासनाकडून ३० रुपये प्रतिकिलो शासनाकडून अनुदान देण्याचा निर्णय घेतला असल्याचे विखे पाटील म्हणाले.

## दानवे विधानपरिषदेतून निलंबित

एकमेकांसमोर भिडले होते. प्रसाद लाड यांनी त्यांच्याकडे बोट दाखवून विधान केले होते. त्यानंतर अंबादास दानवे यांनी आक्रमक होत, माझ्याकडे बोट दाखवल्यास मला तो तोडण्याचा अधिकार असल्याचे म्हणत त्याचवेळी त्यांनी प्रसाद लाड यांना शिवीगाळ केली होती. प्रसाद लाड यांच्या वक्तव्यानंतर अंबादास दानवे टिका करत म्हणाले, मी कट्टर शिवसैनिक आहे, माझा तोल सुटला नसून माझ्यातला शिवसैनिक जागा झाला आहे. माझ्यावर बोट दाखवण्याचा, माझ्याकडे बोट दाखवून बोलण्याचा सदस्याला अधिकार नाही. जो विषय सभागृहाचा नाही, तो राहुल गांधींचा विषय विधान परिषदेत का काढला असा सवालही त्यांनी केला.

सभागृहात अंबादास दानवे यांनी शिवीगाळ केल्याच्या प्रकरणानंतर त्यांच्यावर कारवाई व्हावी यासाठी प्रसाद लाड यांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. तसेच राजकीय वर्तुळातूनही अनेक आरोपप्रत्यारोप झाल्यानंतर अंबादास दावने यांना पाच दिवसांसाठी विधानपरिषदेतून निलंबित करण्यात आले आहे.

## कोतकरसह सहा जणांविरोधात गुन्हा

करू नकोस असे सांगत. दि.२ जुलै राजी रात्री १२ वाजून ४० मिनिटांच्या सुमारास उदयनराजे पॅलेस हॉटेल येथील प्रिन्स याने राकेशकुमार यांना फोन करून शिविगाळ करण्यास सुरूवात केली. त्यानंतर हॉटेल यश पॅलेस बंद करून घरी जाताना सक्कर चौकात उदयनराजे पॅलेसमधील रोशनकुमार मिश्रा उर्फ राजनकुमार, प्रिन्सकुमार सिंग, निरजकुमार, अमन श्रीकांत सिंग, सुनीलकुमार सिंग, हनुमान रामदास झरेकर व आणखी ४ ते ५ अनोळखी इसम राकेशकुमार यांच्याजवळ आले. शिवीगाळ करीत तु यश पॅलेस येथे काम करू नकोस. तु येथून कुठेही जा असा दम देत तुला नगरमध्ये राहू देणार नाही, तुला जीवंत ठेवणार नाही अशी दमदाटी सचिन कोतकर याच्या सांगण्यावरून केल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

## राज्यात जुलैमध्ये जास्त पावसाच्या सरी

२८०.४ तर राज्यात सरासरी ३६२.३ मिलीमीटर पाऊस पडतो, यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे.राज्यात कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्रात चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्या तुलनेत उत्तर महाराष्ट्रात काहीसा कमी पण, सरासरी इतका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जुलै महिन्यांत देशासह राज्यात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. राजस्थान आणि पंजाबचा वायव्य भाग वगळता सोमवारपर्यंत (ता. १) मोसमी पावसाने देशाचा सर्व भाग व्यापला आहे. पुढील तीन दिवसांत देशाच्या उर्वरीत भागात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात पुढील दोन दिवस कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. जून महिन्यात दक्षिण भारताचा अपवाद वगळता देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. जूनमध्ये देशात सरासरी १६५.३ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात १०.९ टक्के कमी म्हणजे १४७.२ मिलीमीटर पाऊस झाला. दक्षिण भारतात सरासरी १६१ मिलीमीटर पाऊस पडतो, तिथे १४.२ टक्के अधिक, १८३.९ मिमी पाऊस झाला आहे. वायव्य भारतात सरासरी ७८.१ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ३२.६ टक्के कमी, ५२.६ मिमी पाऊस झाला. ईशान्य भारतात ३२८.४ मिमी पाऊस पडतो.

# १,६०२ गावांत बाल संरक्षण समित्या रोखणार बालविवाह

■ शेंडी गावापासून जनजागृती सुरू
■ सर्व गावांतील समित्यांची होणार पुनर्रचना



**नगर : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यातील बालविवाहांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी त्या गावातील बाल संरक्षण समिती तातडीने पावले उचलू शकते. ही बाब लक्षात घेत जिल्ह्यातील १ हजार ६०२ गावे, १५ नगरपालिका व नगरपरिषदा, तसेच एका महानगरपालिकेत बाल सरंक्षण समित्यांची पुनर्रचना होणार आहे. याची सुरुवात नगर तालुक्यातील शेंडी गावातून होत आहे.**

शेंडी येथे आयोजित जनजागृती बैठकीला गावातील महिलांचा लक्षणीय उपस्थिती होती. स्नेहालय संचलित उडान प्रकल्प जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी वड्या-वस्त, झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि त्यांचे दुष्परिणाम याविषयी जनजागृती करत आहे. नगर तालुक्यातील शेंडी आणि पोखर्डी या दोन गावात नुकताच जनजागृती कार्यक्रम पार पडला. शेंडीच्या सरपंच प्रज्ञा लोंढे यांनीही यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला. सुमारे ८० महिला यावेळी उपस्थित होत्या.

उडानचे प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी बालविवाह रोखण्यासाठी महिलांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी विवाह करणे कायद्याने गुन्हा असल्याचे सांगितले. सरपंच लोंढे म्हणाल्या, बालविवाहमुक्त गाव करण्यासाठी पुढाकार घेत बाल संरक्षण समिती स्थापन करुन त्या समितीला बालकांच्या संरक्षणासाठी सक्रिय ठेऊ. दरम्यान, ग्रामीण भागात या समित्या बालविवाहांमध्ये तत्काळ हस्तक्षेप करतील.

**असे असणार बालसंरक्षण समितीचे स्वरुप**

१० जून २०१४ च्या शासन निर्णयानुसार बाल संरक्षण समितीवर बालकांवरील अत्याचार, छळ, उपेक्षा रोखण्याची मुख्य जबाबदारी आहे. जिल्ह्यात जिल्हा बाल सरंक्षण कक्ष व प्रत्येक गावात ही समिती असेल. गाव पातळीवर सरपंच अध्यक्ष, अंगणवाडी सेविका सदस्य सचिव असतील. तसेच पोलिस पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, मुख्याध्यापक, १२ ते १८ वर्षे वयोगटातील बालक प्रतिनिधी, आशाताई व सामाजिक कार्यकर्त्यांचा समाविष्ट असतील.

**प्रत्येक गावातील समितीमध्ये महिलांचा असणार लक्षणीय सहभाग**

बालविवाहाचे दुष्परिणाम सर्वाधिक महिलांनाच सहन करावे लागतात. त्यामुळे प्रत्येक गावातील समित्यांमध्ये महिलांचा सहभाग अधिक असावा, याकडे लक्ष दिले जाणार आहे. जेणेकरुन अधिक संवेदनशीलतेने महिला बालविवाह रोखण्यासाठी दक्ष राहतील. जिल्हास्तरीय यंत्रणेला अनेकदा घटनास्थळी जाईपर्यंत बालविवाह उरकलेला असतो, स्थानिक समित्यांमधील महिला वेगाने घटनास्थळी रोखू शकतील, असाही यामागे हेतू आहे.

# पेपरफुटीतील आरोपींना दहा वर्षांची शिक्षा करा- आ.बाळासाहेब थोरात

**मुंबई : प्रतिनिधी**



**राज्यातील प्रत्येक स्पर्धा परीक्षेत घोटाळा होत असल्याच्या मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरलं. पेपरफुटीतील आरोपींना १० वर्षांची शिक्षा करा, अशी मागणी काँग्रेसचे नेते आ.बाळासाहेब थोरात यांनी विधानसभेत केली. पेपरफुटीच्या माध्यमातून कोट्यवधींचा भ्रष्टाचार होत असल्याचे मान्य करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापुढे पेपरफुटीसारखी प्रकरणाला लगाम लावण्यासाठी परीक्षा पद्धतीतील बदल सभागृहात सांगितले.**

पेपरफुटीला लगाम लावण्यासाठी राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. सध्या सर्व स्पर्धा परीक्षा ऑनलाइन होत असल्याने पेपर फुटणे एवढं सोपं नाही. परीक्षा केंद्रावर कर्मचाऱ्यांनी आधीच संगनमत केलं असेल, तरच तासाभरातच पेपर फुटतो. यामुळे परीक्षा केंद्रावर कोण कर्मचारी असेल, हे परीक्षेच्या दिवशी सकाळीच संबंधित कर्मचाऱ्यांना कळेल. जसं निवडणुकीत निरीक्षक असतात तसे परीक्षेच्या दिवशी उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी निरीक्षक म्हणून काम करतील आणि परीक्षा केंद्रांची पाहणी करतील, असे फडणवीस यांनी सांगितले.






# रस्त्याच्या दुरावस्थेमुळे पळशी-वनकुटकर हैराण

## दोन्ही गावच्या सरपंचांचा आंदोलनाचा इशारा

वनकुटे/पळशी : प्रतिनिधी

**वनकुटे ते पळशी दरम्यानच्या रस्त्याची दुरावस्था झाल्याने या भागातील नागरीक हैराण झाले असून या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याच्या मागणीसाठी पळशी व वनकुटे येथील सरपंच आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. तसे निवेदनही त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना दिले आहे.**

तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या वनकुटे व पळशी येथे मुख्यतः आदिवासी समाज मोठया प्रमाणावर आहे. तालुक्याच्या एका कोपऱ्यात असलेल्या या गावांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याने पळशी ते वनकुटे या रस्त्याची कधी डागडुजीच झाली नाही. परिणामी आजमितीस या रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असून या रस्त्यावरून वाहने हाकावी तरी कशी असा प्रश्न वाहनचालकांपुढे उभा राहतो आहे. दुचाकी चालकांना तर या रस्त्यावरून प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागत असून अनेक दुचाक्यांचे अपघात होऊन प्रवासी जखमी झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत.



■ पळशी ते वनकुटे रस्त्याची दुरावस्था झाली असून दुरूस्तीसाठी दोन्ही गावच्या सरपंचांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### बँक कामकाजासाठी रस्त्यावर वर्दळ

**विधवा, वृध्द, परित्यक्त्या, अपंग आदींना दरमहा मिळणारे अनुदान, शेतीच्या विविध योजनांचे अनुदान किंवा इतर कोणत्याही शासकीय कामासंदर्भात बँकेशी प्रत्येक नागरीकाचा संबंध येतो. पळशी येथे सेंट्रल बँकेची शाखा असल्याने वनकुटे परिसरातील नागरीकांचे पळशी येथे या रस्त्यावरून नेहमीच वर्दळ असते. खडकवाडी भागात शाळा, महाविद्यालय असल्याने विद्यार्थ्यांनाही या रस्त्याचा वापर करावा लागतो.**

### आंदोलनाशिवाय पर्याय नाही

**पळशी येथे सेंट्रल बँकेची शाखा आहे त्यामुळे वनकुटे व परिसरातील नागरीकांना बँकेच्या व्यवहारासाठी नेहमीच पळशी येथे जावे लागते. खडकवाडी येथे शाळा महाविद्यालयाची सोय असल्याने विद्यार्थ्यांना दररोज या मार्गाने प्रवास करावा लागतो. या रस्त्याची उपयुक्तता लक्षात घेऊन काम तातडीने होणे गरजेचे आहे. न झाल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नाही.**

सुमन रांधवन, सरपंच, वनकुटे

### आदिवासी बांधवांसह उपोषण करणार

**रस्त्याच्या दुरावस्थेबाबत वनकुटयाच्या सरपंच सुमन रांधवन तसेच पळशीचे सरपंच प्रकाश राठोड यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्त्याच्या दुरावस्थेकडे अनेकदा लक्ष वेधले. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने बांधकाम विभागाच्या पारनेर येथील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसून या मागणीची तड लावण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. पळशी वनकुटे भागातील नागरीकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने हा रस्ता महत्वाचा आहे. या भागात आदिवासी समाज मोठया संख्येने वास्तव्यास आहे. तो सोशीक असला तरी त्यांना त्यांच्या अधिकाराची जाण आहे. अनेक दिवसांपासून रस्त्याची दुरावस्था होऊनही मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याने आदिवासी बांधवांसह उपोषण करण्यात येईल.**

प्रकाश राठोड
सरपंच, पळशी

# मळगंगा ग्रामीण ट्रस्ट सल्लागारपदी सात सदस्यांची नियुक्ती

## विश्वस्त मंडळाच्या बैठकीत नियुक्त्या

निघोज : प्रतिनिधी

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट सल्लागार सदस्य म्हणून सात सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. मंगळवार दि.२ जुलै रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत या नियुक्त्या करण्यात आल्या ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम लंके या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.**



रुपेश मारुती ढवण, सुदर्शन सुर्यकांत लोढा मंगेश भिवाजी लंके, सदानंद ऊर्फ राजेंद्र भिकाजी ढवळे, दिलीप यशवंत लाळगे, गंगाराम जबाजी वराळ, नवनाथ कृष्णा लाळगे यांची सल्लागार सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

यावेळी ट्रस्ट कार्याध्यक्ष शांताराम लंके, उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वास शेटे, संघटक रामदास वरखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वस्त ठकाराम लंके, अनिल शेटे, अनिल लंके,विठ्ठलराव कवाद, संतोष रसाळ,शंकरराव लामखडे,रामदास लामखडे,रामदास ससाणे,लक्ष्मण ढवळे,रोहिदास लामखडे,ज्ञानेश्वर लंके , अशोक वरखडे,मंगेश वराळ,मोहिनी वरखडे, सिमा वराळ, व्यवस्थापक महेश ढवळे, उपव्यवस्थापक रोहन उनवणे आदी यावेळी उपस्थित होते.

# सुषमा रावडे महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष

## राष्ट्रवादी अजित पवार गटाची नियुक्ती जाहिर

पारनेर/सुपा : प्रतिनिधी

**तालुक्यातील कडूस येथील सुषमा लहानू रावडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे यांनी रावडे यांना नियुक्तीचे पत्र दिले.**



सुषमा रावडे या कडूस ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या आहेत. त्यांच्या सामाजिक कार्यातील योगदानाची दखल घेऊन त्यांना पारनेर तालुका महिला आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार , प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे विचार, पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहचवावेत, पारनेर तालुक्यात महिला संघटन मजबुत करण्यात यावे, नव्याने महिलांसाठी अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी घोषणा केलेल्या योजना राबविण्यासाठी प्रयत्नशिल रहावे अशी अपेक्षा नागवडे यांनी नियुक्तीपत्र देताना व्यक्त केली आहे.

रावडे यांच्या नियुक्तीबद्दल पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, महिला जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राज्याचे उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, पारनेर तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, युवकचे अध्यक्ष भास्कर उचाळे यांनी अभिनंदन केले.

# संतश्रेष्ठ रामदास महाराज दुसाणे यांचे धार्मिक कार्य महान - शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद



निघोज : प्रतिनिधी

**संतश्रेष्ठ रामदास महाराज दुसाणे यांचे धार्मिक कार्य महान असून त्यांच्यामुळे निघोज आणि परिसरातील जनतेला अध्यात्मिक आवड निर्माण झाली असून दिंडी मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब महाराज कोल्हे यांनी दुसाणे महाराज यांची सेवा करीत धार्मिक संस्कृतीला चालना देण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांनी व्यक्त केले.**

श्री. संत निळोबाराय पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी रामदास महाराज दुसाणे दिंडी सोहळा मंगळवार दि. २ जुलै रोजी मळगंगा देवीला चोळी पातळ व पुष्पहार अर्पण करून व पुजा विधी करीत रवाना झाला यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघ व पत्रकार संघ विभागिय कार्यालय निघोज तसेच विद्याधन शिक्षण समूहाच्या वतीने दिंडी चालक भाऊसाहेब महाराज कोल्हे यांचा सत्कार कवाद यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, दिंडी सोहळ्याचे उपाध्यक्ष दिलीप खोसे, कार्याध्यक्ष रंगनाथ ढवण, दिंडीचालक महेश महाराज खाटेकर , माजी उपसभापती खंडू भुकन, कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ वरखडे, भरत ढवळे, हौशाभाऊ शेटे, शेटे महाराज, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, सुरेश रसाळ , सुनिल कोल्हे, अनिल कोल्हे, फोटोग्राफर संघटनेचे पदाधिकारी जयसिंग हरेल आदी तसेच भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवव्याख्याते प्रा.कवाद यावेळी म्हणाले,गेली अनेक वर्षांपासून कोल्हे महाराज हे अध्यात्मिक क्षेत्रात चांगले काम करीत असून संतश्रेष्ठ रामदास महाराज दुसाणे यांच्या आशिर्वादाने या परिसरात धार्मिक संस्कृतीला चालना मिळाली आहे.

# भक्तीप्रेम वेब सिनेमात विशाल पाटमासची प्रमुख भूमिका

■ पंढरीच्या वारीतही होणार चित्रीकरण ■ दिग्दर्शक भाऊसाहेब इरोळे यांची माहीती

सुपा : प्रतिनिधी

**सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील विशाल पाटमास या कलाकराची अश्वयुग टीव्हीच्या भक्तीप्रेम या वेब सिनेमामध्ये प्रमुख भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे. या सिनेमाची १० टक्के चित्रीकरण पंढरीच्या वारीमध्ये होणार असून ऑगस्ट महिन्यात हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे दिग्दर्शक भाऊसाहेब इरोळे यांनी सांगितले.**



शिरूर येथील नटराज कोहिनूर ड्रीम्स अकॅडमी ऑफ फिल्म इन्टिटयूटमध्ये अभियानाचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर विशाल याने मुंबईत दोन-तीन महिने सिरीयलमध्ये सहकलाकार म्हणून अभिनय केला. पार्ट टाईम जॉब म्हणून मिसळ हाउसही सुरू केले. हे करतानाच आतापर्यंत टी सिरीजसाठी अल्बम, चित्रपट, सहयाद्री वाहीनीसाठी मालिकांसाठी दिग्दर्शन केलेले तसेच सध्या पारनेरचे खासदार नीलेश लंके यांच्या जीवनावर आधारित आखाड चित्रपटाचे दिग्दर्शन करणारे, ऑक्टोबर २०२४ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शीत होणाऱ्या निळावंती एक रहस्य या चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक भाऊसाहेब इरोळे यांच्या लवकरच सुरू होत असलेल्या भक्तीप्रेम या मराठी वेब सिनेमात विशालची मुख्य भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे.

या वेब सिनेमाचे पंढरीच्या आषाढी वारीमध्ये १० टक्के चित्रीकरण करण्यात येणार असून १ ते २ गाणीही या वेब सिनेमात पहावयास मिळणार आहेत. ऑगस्टमध्ये प्रेक्षकांच्या भेटीसाठी हा वेब सिनेमा येणार आहे. करमाळयाच्या सर्वसामान्य कुटूंबातील मुलगा सिनेमामध्ये मुख्य भूमिका करत असल्यामुळे त्याचे नातेवाईक, मित्रमंडळींकडून कौतुक करण्यात येत आहे.

### अभिनय क्षेत्रात पाऊल

**गरीब कुटूंबातून आलेल्या विशाल याने दहावी नंतर मिळेल ते काम करून पदवीपर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर त्यास हवी तशी नोकरी मिळाली नाही. मात्र हताश न होता त्याने अभिनय क्षेत्रात पाऊल टाकण्याचा निर्णय घेतला. शिरूर येथील नटराज कोहिनूर ड्रीम्स अकॅडमी ऑफ फिल्म इन्टिटयूटमध्ये त्याने प्रशिक्षण पुर्ण केले.**

# रामदास महाराज दुसाणे मंडळाची दिंडी पंढरीकडे!

## पाडळी दर्या,पिंपळनेर मार्गे पायीवारी रवाना

निघोज : प्रतिनिधी

**गेली अनेक वर्षांपासून रामदास महाराज दुसाणे मंडळाची दिंडी पंढरपूर येथे पायी वारी सोहळा करीत असून गेली तीन वर्षांपासून श्री संत निळोबाराय यांच्या दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून हा दिंडी सोहळा पंढरपूर पायीवारीने रवाना झाला आहे.**



विठू नामाचा जयजयकार करीत रामदास महाराज पर्णकुटी येथे संतांच्या प्रतिमेचे दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष भाऊसाहेब महाराज कोल्हे, उपाध्यक्ष दिलीप खोसे, कार्याध्यक्ष रंगनाथ ढवण, दिंडी चालक महेश महाराज खाटेकर, पोपट महाराज देशपांडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी विश्वस्त नाना पाटील लंके, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, गोकर्ण ज्वेलर्सचे मालक गोरख लामखडे, राहुल ढवण अनिल कोल्हे, सुनिल कोल्हे, कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ वरखडे, माजी उपसभापती खंडू भुकन, पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य जयसिंग हरेल , दौलतराव पांढरकर, साबळे महाराज यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंडी मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब महाराज कोल्हे यावेळी म्हणाले गेली अनेक वर्षांपासून शेकडो भाविक निघोज परिसरातून पंढरपूर पायी वारी करीत असून गुरुवर्य रामदास महाराज दुसाणे यांच्या कृपाआशिर्वादाने हा दिंडी सोहळा सुरू झाला असून श्री संत निळोबाराय यांचे दर्शन घेऊन हा दिंडी सोहळा श्री संत निळोबाराय पालखी सोहळ्यात सहभागी होऊन पंढरपूरकडे जाणार आहे. श्री संत निळोबाराय पालखी सोहळ्याचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली या दिंडी सोहळ्यात भाविकांची अतिशय चांगली व्यवस्था होत असून या दिंडी सोहळ्यातील भाविकांचे ठिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे या दिंडी सोहळ्याला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून पिंपळनेर येथून ऐंशीपेक्षा जास्त दिंड्या सहभागी होत असून हजारो भाविक सहभागी झाले आहेत.

# काकडे यांचा संघर्ष इतरांसाठी प्रेरणादायी

## डॉ. भाऊसाहेब खिलारी यांचे प्रतिपादन




पारनेर : प्रतिनिधी

**प्रा. भीमराज काकडे यांनी प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करीत वाटचाल केली असून त्यांची ही वाटचाल इतरांसाठी प्रेरणादायी आहे. असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले.**

पारनेर महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रा. भीमराज जयराम काकडे हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्यामुळे त्यांचा सेवापुर्ती गौरव समारंभ डॉ. खिलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी डॉ. खिलारी हे बोलत होते.

डॉ.खिलारी म्हणाले, शिक्षक हा समाज घडविण्याचे महत्वाचे काम करतो. समाजाला दिशा दाखविणे, विवेकशील विचार निर्माण करणे, आदर्श समाज घडविण्यात शिक्षकाची भूमिका महत्वाची असते. काकडे यांनी अध्यापन, अध्यायन, संशोधन आणि आरोग्य या चारही गोष्टी अतिशय जबबदारीने सांभाळल्या. त्यामुळेच ते अतिशय उत्तमपणे आयुष्य व्यथीत करीत असल्याचे डॉ. खिलारी म्हणाले.

प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर म्हणाले, समाज घडविण्यामध्ये शिक्षक अत्यंत महत्वाचे काम करतात. डॉ. काकडे यांनी इतिहासाविषयी अधिक सखोल पध्दतीने मांडणी कशी करावी ? इतिहास कसा शिकवावा ? इतिहास कसा समजाउन घ्यावा याचे अधिक मुलभूत प्रकाचे विचार प्रकट केलेले दिसून येत असल्याचे डॉ. मतकर म्हणाले.

यावेळी मा. प्राचार्य डॉ. नामदेव कदम, प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, डॉ. तुकाराम थोपटे, डॉ. हनुमंत गायकवाड, प्रा. अशोक शिंदे, प्रा. लक्ष्मण कोठावळे, डॉ. भिमराज काकडे, यांच्यासह डिकसळ येथील अनेक ग्रामस्थांसह प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. हरेश शेळके यांनी सुत्रसंचलन, डॉ. अनिल आठरे यांनी प्रास्ताविक, डॉ. दिपक सोनटक्के यांनी आभार मानले.

### इतिहासाच्या शिक्षकांचे महत्त्वाचे काम

**इतिहास समजून घेणे, इतिहास वाचणे आणि इतिहास समजावून सांगणे तसेच इतिहासातील घडामोडींचा अनवयार्थ वर्तमानाशी लावणे हेच अत्यंत महत्वाचं काम इतिहास विषयाचे शिक्षक करत असतात. ते काम अतिशय निष्ठेने गेली ३२ वर्षे डॉ. भिमराज काकडे प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने करत आहेत.**

डॉ. भाऊसाहेब खिलारी
सदस्य, कार्यकारी मंडळ
जि. म. वि. प्र. स. नगर

# ५०० वृक्षांचे रोपण केले आता संवर्धनही करणार!

## भोयरे गांगर्डातील तरूणाईचा आदर्श उपक्रम

सुपा : प्रतिनिधी

**दिवसेंदिवस होणाऱ्या बेसुमार वृक्ष तोडीमुळे निसर्गाचे संतुलन ढासळते असून त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. पर्यावरणाच्या संतुलनास हातभार लावण्यासाठी तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथील तरूणाई सरसावली असून या पावसाळयात ५०० वृक्षांचे रोपण करून त्याचे संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. भोयऱ्यातील तरूणाईच्या या आदर्श उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.**



वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्याचा निर्णय झाल्यानंतर सामाजिक वनीकरण विभागामार्फत भोयरे गांगर्डा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ५०० रोपे उपलब्ध करून देण्यात आली. त्यात करंजी, कांचन, भेंडी, कवठ, आवळा, शिसम आदी जंगली झाडांचा समावेश आहे.

निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी तरूणांनी आपल्या कामातून वेळ काढून श्रमदान, झाडांना पाणी देण्यासाठी टँकरची सुविधा, खड्डे खोदण्यासाठी यांत्रीक उपकरणे आदींचे नियोजन करून वृक्षारोपण करण्यात आले असून आता या झाडांचे संवर्धन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला असून अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. या पार्श्वभुमीवर तरूणांनी हाती घेतलेल्या या उपक्रमाचे गावकऱ्यांनी कौतुक केले. रविंद्र भोगाडे, नितीन भोगाडे, मयुर भोगाडे यांनी या उपक्रमासाठी टँकर उपलब्ध करून दिला तर मयुर गांगड यांनी यांत्रीक उपकरण उपलब्ध करून दिले. रोपण करण्यात आलेल्या वृक्षांच्या संरक्षणची तसेच पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी या तरूणांनी घेतली असून त्यांच्या या उपक्रमाचा इतरांनी आदर्श घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### आणखी ५०० झाडांचे उद्दीष्ट

**दिवसेंदिवस मोठया प्रमाणावर वृक्षतोड होत आल्याने तापमानात मोठया प्रमाणावर वाढ झाल्याचे पहावयास मिळते. यंदा ४३ अंश सेल्सीयस पर्यंत तापमानाची नोंद झाली. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आम्ही तरूणांनी एकत्र येत ५०० रोपांचे रोपण केले आहे. आणखी ५०० झाडांचे रोपण करण्याचे आमचे उद्दीष्ट आहे. गावोगावी तरूणांनी अशा प्रकारे नियोजन केले तर भविष्यात पर्यावरणाचा समतोल ढासळणार नाही.**

अनिकेत भोगाडे
वृक्षप्रेमी

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com